# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 फॅक्स क्र. 0712-2561663
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-2/2018/ 348/
दिनांक:- 20 OCT 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व **D.Pharm & D.HMCT** व **Polytechnic** संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील D.Pharm & D.HMCT व Polytechnic अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. 10/एडीएम/प्रवेश यादी पडताळणी/2018/1168, दि.28.09.2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या **प्रथम वर्ष D.Pharm & D.HMCT प्रथम व थेट द्वितिय वर्ष Polytechnic** पदवीका अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येणार आहेत. पडताळणी करतांना सर्वसाधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे.

1. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची आपल्या संस्थेतील प्राचार्यांनी/ संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेत सर्व प्रकारच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी केली असल्याचे संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीच्या वेळेस सोबत आणावे.
2. गुणवत्ता यादी पडताळणीसाठी संचालनालयाचा सांकेतांक व पासवर्डद्वारे Online पध्दतीने Login करुन संस्थेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांची यादीची Printout घेऊन ती पडताळणीकरीता उपयोगात आणली जाईल कोणत्याही परिस्थित संचालनालयाच्या स्थळाव्यतीरीक्त (उदा. Word / Excel file etc.) पडताळणीकरीता वापरली जाणार नाही.
3. **गुणवत्ता यादीत काही अनियमीतता आढळुन आल्यास गंभीर कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**
4. पडताळणी करतांना उमेदवारांचे प्रवेश रद्द केले/ झाले तर संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या Login मधुन Online पध्दतीने अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करुन त्यानंतर गुणवत्ता यादीची Printout घेऊन त्यानुसार पडताळणी करण्यात येईल. गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर आढळुन आलेल्या सर्व त्रुटींची पुर्तता आपल्या संस्थेनी दिलेल्या वेळेत करावी.
5. या कार्यालयाच्या स्तरावर संस्थेची गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर त्या यादीची मुळ प्रत या कार्यालयात ठेवण्यात येईल व पडताळणी केलेल्या यादीची एक Xerox प्रत अनुक्रमे आणि संबंधित संस्थेस,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, व संचालनालयास देण्यात येईल.

पान नं. 2 वर

6. **गुणवत्ता यादी पडताळणी करतेवेळी शुल्क परताव्याबाबत आपल्या संस्थेबद्दल काही तक्रारी आहे किंवा कसे याची शहानीशा करुन व तक्रार असल्यास ती नियमानुसार निवारण करण्यात आली किंवा कसे याची पडताळणी केल्यानंतर गुणवत्ता यादी पडताळणीची कार्यवाही करण्यात येईल. शुल्क परतावा किंवा परत न करणे अशा प्रकारच्या तक्रारीचे निवारण झालेले नसल्यास प्रवेश नियमावलीतील नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व यापुढे अशा प्रकारचे नियमबाह्य कृत्य होणार नाही असे प्राचार्याकडुन लेखी हमीपत्र सादर केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणी करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. तसेच शुल्क परताव्याबाबत संस्थेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र आपले संस्थेतील प्राचार्याकडुन सादर करावे.**

7. नवीन संस्थांनी आवश्यक रक्कमेची नियत ठेव (Fix Diposit) भरणा केली आहे किंवा नाही याबाबतसुध्दा प्राचार्यांनी माहिती द्यावी. ठेव भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर गुणवत्ता यादीची पडताळणी करण्यात येईल तसेच शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये ज्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडुन प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवाणगी देण्यात आलेली आहे. अशा संस्थांकडुन शासनास भरणा करावयाच्या नोंदणी शुल्काची आकारणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत त्यानुसार अशा संस्थांनी नोंदणी शुल्क भरण्यात यावी याची नोंद घ्यावी.

8. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थाच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याच्या वैध कालावधी पडताळणी करण्यात येईल.

9. **संस्थेने विहीत दिनांकापर्यंत विभागीय कार्यालयात प्रवेश यादी सादर करणे आवश्यक आहे.**

10. मागासवर्गीय उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना/परिपत्रक/पत्र विचारात घेउन अशा प्रकरणी अंतिम पडताळणी करण्यात येईल.

11. या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत व विद्यापीठ विभाग संस्था यामधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्यतीरिक्त संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रवेश यादीची अंतिम पडताळणी शासन नियमानुसार करण्यात येईल.

12. उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत " राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृती योजना " व " डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना " या योजनातंर्गत शै.वर्ष मध्ये वितरीत केलेल्या शिष्यवृती " उपयोगिता प्रमाणपत्र " संस्थाकडून घेण्यात येईल.

13. प्रवेश याद्या पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न करणा-या संस्थामधील उमेदवारांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थाप्रमुख व्यक्तीशः जबाबदार राहतील.

14. **तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रीयाच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत त्वरीत पडताळणी करुन तंत्रशिक्षण संचालनालयाला सादर करणे गरजेचे असल्याने त्यानुसार आपण आपल्या संस्थेची गुणवत्ता यादी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार त्वरीत पडताळणी करुन घ्यावी.**

**पान नं. 3 वर**

गुणवत्ता यादी मंजुर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाह्य प्रवेश अथवा कोणत्याही प्रकारची अनियमीतता असल्याचे आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील.

**गुणवत्ता यादी पडताळणीकरीता येतांना सोबत तपासणीकरीता लागणारे साहित्य जसे की Paper Rim, Calculator, Stapler, Punching Machine, Pen (Red & Blue), Flag etc. सोबत आणने आवश्यक आहे.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

सहपत्र- 1) वेळापत्रकाची प्रत
2) संदर्भांकीत पत्राची प्रत

# गुणवत्ता यादी तपासणी वेळापत्रक शै. वर्ष- 2018-19
## अभ्यासक्रमाचे नांव - D.PHARM & DHMCT

| अ. क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4019 | Nagar Yuvak Shikshan Sanstha Adv. V.R.Manohar Institute Of Diploma In Pharmacy, Nagpur | D.Pharm | 60 | 60 | 23 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 2 | 4020 | Shikshan Prasarak Mandal's Smt. Kusumtai Wankhede Institute of Pharmacy, Katol | D.Pharm | 60 | 59 | |
| 3 | 4021 | Vidharbha Youth Welfare Society's Institute of Diploma in Pharmacy Borgaon Meghe,Wardha | D.Pharm | 60 | 60 | |
| 4 | 4022 | Government Institute of Hotel Management & Catering Technology, Nagpur | D.HMCT | 63 | 62 | |
| 5 | 4161 | Jay Mahakali Shikshan Sanstha's Agnihotri College of Pharmacy, Wardha | D.Pharm | 50 | 50 | 24 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 6 | 4164 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's , Priyadarshini J.L.Chaturvedi College of Pharmacy(Diploma), Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 7 | 4210 | Shree Tuljabhavani Sevabhavi Saikshanik & Samajik Sanstha, Hi-Tech College of Pharmacy, Morwa, Chandrapur | D.Pharm | 50 | 50 | |
| 8 | 4260 | Sikh Education Society's Gurunanak Technical Institute of Pharmacy, Nagpur | D.Pharm | 60 | 59 | 25 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे |
| 9 | 4261 | Shri Bhawabhuti Shikshan Sanstha's Shri Laxmanrao Mankar Institute Of Pharmacy, Amgoan | D.Pharm | 60 | 60 | |
| 10 | 4262 | Ravi Bahu-Uddeshiya Shikshan Sanstha's Ravi Institute Of Diploma In Pharmacy, Mahadula, Devi Road, Koradi | D.Pharm | 60 | 60 | |
| 11 | 4263 | Shri Sadashivrao Patil Shikshan Sanstha's shrimati shantabai patil Institute of Diploma in Pharmacy, Kamptee | D.Pharm | 60 | 60 | |
| 12 | 4264 | Gondiya Education Society's Manoharbhai Patel Institute of Pharmacy, Gondia | D.Pharm | 60 | 60 | 26 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 13 | 4266 | Mehmuda Shikshan & Mahila Gr. Vikas Bahu. Sanstha's Central India Institute Of Pharmacy, Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 14 | 4267 | Sarodaya Mahila Mandal's Priyadarshani Yashodhara College Of Pharmacy,Chandrapur | D.Pharm | 60 | 60 | |
| 15 | 4268 | Wainganga Bahu-uddeshiya Vikas Sanstha,s Bajiraoji Karanjekar College of Pharmacy, Sakoli | D.Pharm | 60 | 59 | |
| 16 | 4269 | Shri.Sadashivrao Patil Shikshan Sanstha's Anurag College Of Pharmacy , Warathi, Bhandara | D.Pharm | 60 | 60 | 27 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 17 | 4270 | Backward Class Youth Relief Committee's Institute of D. Pharmacy, Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 18 | 4271 | Jai Mahakali Shikshan Sanstha's Agnihotri Institute of Diploma in Pharmacy, Wardha | D.Pharm | 60 | 60 | |

| अ. क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 19 | 4272 | Bhausaheb Mulak Charitable Trust 'S Bhausaheb Mulak College Of D. Pharmacy, Umred, Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 20 | 4274 | Abhinav Bahuuddeshiya's Siddhivinayak College Of Pharmacy, Chandrapur | D.Pharm | 60 | 60 | 29 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 21 | 4275 | Mahatma Phule Samata Shikshan Sanstha's K.D. Pawar College of Pharmacy, Saoner,Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 22 | 4276 | Mahila Vikas Sanstha's Dr. R.G. Bhoyar Institute Of Pharmacy, Wardha | D.Pharm | 60 | 60 | |
| 23 | 4277 | Sudam Shikshan Prasarak Mandal's Shree Babasaheb Gharfalkar College Of Pharmacy, Nachangaon, Pulgaon | D.Pharm | 60 | 60 | |
| 24 | 4278 | Young Engineers Education Society's Maharashtra Institute Of Pharmacy, Betada, Bramhapuri, Chandrapur | D.Pharm | 120 | 120 | |
| 25 | 4279 | Sanmarg Shikshan Sanstha's K.R.Pandav Institute Of Pharmacy, Nagpur | D.Pharm | 60 | 60 | 30 ऑक्टो. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 26 | 4280 | Krushna Sahyogi Tantra Shikshan Sanstha's Chatrapati Shivaji College Of Pharmacy, Devari, Tal. Devari, Dist.Gondiya | D.Pharm | 60 | 60 | |
| 27 | 4281 | Shri Sachhidanand Shikshan Santha's Taywade Institute Of Diploma In Pharmacy, Koradi, Kamptee,Dist.Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 28 | 4283 | Swa. Madhukarrao Deshmukh Education Society, Shree Sadguru Datta Institute of Pharmacy, Bhajapur | D.Pharm | 60 | 60 | |
| 29 | 4640 | Abdul Majeed Central Education Society, Institute of Pharmacy, Lonara | D.Pharm | 60 | 60 | |
| 30 | 4641 | Dr.Babasaheb Ambedkar Institute of D-Pharmacy, Sewagram, Wardha | D.Pharm | 60 | 60 | 1 नोव्हें. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 31 | 4644 | Dadasaheb Balpande College of Diploma in Pharmacy, (DBCDIP) Nagpur | D.Pharm | 60 | 60 | |
| 32 | 4650 | P.R.Patil Institute of Pharmacy, Talegaon(SP),Wardha | D.Pharm | 60 | 59 | |
| 33 | 4651 | Central India College of Pharmacy(D.Pharm), Nagpur | D.Pharm | 50 | 50 | |
| 34 | 4652 | Mouda College of Pharmacy, Mauda Nagpur | D.Pharm | 50 | 50 | 2 नोव्हें. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| 34 | 4655 | Dr.Arun Motghare Diploma in Pharmacy, Kosara,Konda | D.Pharm | 60 | 50 | |

टिप-गुणवत्ता यादीची पडताळणी झाल्यानंतर त्रुट्यांची पुर्तता 1 आठवड्याच्या आत करावी

(Gulabrao Thakare)
Joint Director
Technical Education
R. O. NAGPUR

# गुणवत्ता यादी तपासणी वेळापत्रक शै. वर्ष- 2018-19
## अभ्यासक्रमाचे नांव - POLYTECHNIC

| अ.क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4135 | Amar Seva Mandal's Shree Govindrao Vanjari College of Engineering & Technology, Nagpur | POLY-I | 180 | 104 | दि. 23 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 150 | 150 | |
| 2 | 4145 | Wainganga College of Engineering and Management, Dongargaon, Nagpur | POLY-I | 240 | 69 | |
| | | | DIR-IIND | 218 | 107 | |
| 3 | 4151 | Vidarbha Bahu-Uddeshiya Shikshan Sanstha's Tulshiramji Gaikwad Patil College of Engineering & Technology, Nagpur | POLY-I | 240 | 195 | |
| | | | DIR-IIND | 199 | 198 | |
| 4 | 4181 | Sarvasiddhanta Education Soc's Nuva College of Engineering and Technology, Nagpur | POLY-I | 180 | 69 | |
| | | | DIR-IIND | 163 | 46 | |
| 5 | 4188 | Krushi Jivan Vikas Pratishthan, Ballarpur Institute of Technology, Mouza Bamni | POLY-I | 504 | 160 | |
| | | | DIR-IIND | 430 | 323 | |
| 6 | 4190 | M.D. Yergude Memorial Shikshan Prasarak Mandal's Shri Sai College of Engineering & Technology, Badravati | POLY-I | 120 | 9 | दि. 24 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 120 | 30 | |
| 7 | 4193 | K.D.M. Education Society, Vidharbha Institute of Technology,Umred Road ,Nagpur | POLY-I | 180 | 44 | |
| | | | DIR-IIND | 152 | 63 | |
| 8 | 4195 | Vidharbha Bahu uddeshiya Shikshan Sanstha's Abha Gaikwad – Patil College of Engineering, Nagpur | POLY-I | 180 | 27 | |
| | | | DIR-IIND | 211 | 175 | |
| 9 | 4222 | KDK Nagpur Polytechnic, Nagpur | POLY-I | 533 | 118 | |
| | | | DIR-IIND | 615 | 266 | |
| 10 | 4223 | Anjuman Hami-E-Islam's Anjuman Polytechnic, Nagpur | POLY-I | 441 | 178 | |
| | | | DIR-IIND | 306 | 186 | |
| 11 | 4224 | Shri Datta Meghe Polytechnic, Nagpur | POLY-I | 315 | 126 | |
| | | | DIR-IIND | 412 | 117 | |
| 12 | 4226 | Ankush Shikshan Sanstha's G.H. Raisoni Polytechnic, Nagpur | POLY-I | 504 | 214 | |
| | | | DIR-IIND | 332 | 211 | |

| अ.क्र. | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | 4227 | Vivekanand Polytechnic,SitaSaongi,Tal-Tumsar,Dist-Bhandara | POLY-I | 144 | 66 | दि. 25 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 229 | 61 | |
| 14 | 4229 | Bajaj Chandrapur Polytechnic, Chandrapur | POLY-I | 378 | 90 | |
| | | | DIR-IIND | 301 | 116 | |
| 15 | 4230 | Shri Sadashivrao Patil Shikshan Sanstha's Kamptee Polytechnic, Kamptee | POLY-I | 224 | 66 | |
| | | | DIR-IIND | 336 | 100 | |
| 16 | 4231 | Sanmarg Shikshan Sanstha's Late Vasantdada Polytechnic, Nagpur. | POLY-I | 441 | 14 | |
| | | | DIR-IIND | 446 | 59 | |
| 17 | 4232 | Navodaya Shikshan Sanstha's Shankarrao Dhawad Polytechnic, Nagpur | POLY-I | 158 | 14 | दि. 26 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 205 | 9 | |
| 18 | 4233 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's Priyadarshini Polytechnic, Nagpur | POLY-I | 504 | 77 | |
| | | | DIR-IIND | 477 | 169 | |
| 19 | 4234 | Late M.D. Yergude Memorial Shikshan Prasarak Mandal's Shri Sai Polytechnic, Chandrapur | POLY-I | 447 | 101 | |
| | | | DIR-IIND | 472 | 152 | |
| 20 | 4235 | Jai Mahakali Shikshan Sanstha's Agnihotri School of Technology, Ramnagar, Wardha | POLY-I | 376 | 121 | |
| | | | DIR-IIND | 368 | 124 | |
| 21 | 4238 | Sanmarg Shikshan Sanstha, Shri Krushnarao Pandav Polytechnic, Bahadura, Nagpur | POLY-I | 315 | 21 | |
| | | | DIR-IIND | 323 | 100 | |
| 22 | 4239 | The Shriram Gramvikas Shikshan Sanstha, Baburaoji Tidke Polytechnic, Mouda, Nagpur | POLY-I | 204 | 0 | |
| | | | DIR-IIND | 204 | 15 | |
| 23 | 4240 | M.S. & M.G.V.B.S., Central India Institute Of Polytechnic, Nagpur | POLY-I | 315 | 0 | दि. 27 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 272 | 17 | |
| 24 | 4241 | Sanmarg Shikshan Sanstha, Shri Sharadchandra Pawar Polytechnic, Bhilewada | POLY-I | 189 | 17 | |
| | | | DIR-IIND | 154 | 65 | |
| 25 | 4242 | Mata Mahakali Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal's Mata Mahakali Polytechnic College, Warora | POLY-I | 315 | 233 | |
| | | | DIR-IIND | 209 | 189 | |
| 26 | 4243 | Sanmarg Shikshan Sanstha'sm Smt. Radhikatai Pandav Polytechnic, Besa, Nagpur | POLY-I | 378 | 15 | |
| | | | DIR-IIND | 394 | 58 | |
| 27 | 4245 | Gopal Education Soceity's Shri Mukundrao Pannase Polytechnic, Mauza Mondha | POLY-I | 189 | 59 | |
| | | | DIR-IIND | 177 | 15 | |
| 28 | 4246 | Jaideo Education Society, J.D. Polytechnic, Khandala, Nagpur | POLY-I | 441 | 144 | |
| | | | DIR-IIND | 341 | 190 | |

| अ.क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 29 | 4247 | Laxmanrao Mankar College Of Polytechnic, Amgaon, Gondia | POLY-I | 252 | 29 | |
| | | | DIR-IIND | 273 | 160 | |
| 30 | 4248 | Shri Sai Shikshan Sanstha's Nit Polytechnic, Nagpur | POLY-I | 435 | 285 | दि. 29 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 282 | 269 | |
| 31 | 4249 | Shri Nirmaladevi Education Soceity's Sonatai Pandav Polytehnic, Paradsinga | POLY-I | 315 | 14 | |
| | | | DIR-IIND | 336 | 40 | |
| 32 | 4250 | Maratha Shikshan Sanstha's P.R.Patil Instittute Of Polytechnic, Talegaon, Asthi, Wardha | POLY-I | 189 | 62 | |
| | | | DIR-IIND | 142 | 49 | |
| 33 | 4251 | Sant Tukdoji Maharaj Shikshan Sanstha's Shri Sai Taj Polytechnic, Drugdhamna, Nagpur | POLY-I | 441 | 19 | |
| | | | DIR-IIND | 486 | 70 | |
| 34 | 4252 | Late Madhukarrao Deshmukh Education Soceity's Avdhoot Diploma College Of Engineering, Mouza, Bhojapur | POLY-I | 126 | 29 | |
| | | | DIR-IIND | 80 | 60 | |
| 35 | 4253 | Late Shri Laxmaji Motghare Chritable Trust's Dr. Arun Motghare Polytechnic, Kosara-Konda, Bhandara | POLY-I | 189 | 4 | दि. 30 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 192 | 16 | |
| 36 | 4254 | Krushna Sahayogi Tantra Shikshan Sanstha, Chatrapati Shivaji Institute Of Technology, Deori, Gondia | POLY-I | 189 | 59 | |
| | | | DIR-IIND | 126 | 87 | |
| 37 | 4255 | Jai Mahakali Shikshan Sanstha's Agnihotri Polytechnic, Sindhi (Meghe), Wardha | POLY-I | 189 | 59 | |
| | | | DIR-IIND | 99 | 27 | |

| अ.क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 38 | 4258 | Dharampeth Education Soceity's Dharampeth Polytechnic, Nagpur | POLY-I | 315 | 55 | |
| | | | DIR-IIND | 313 | 52 | |
| 39 | 4597 | Jai Mahakali Shikshan Sanstha, Pulgaon Polytechnic,Pulgaon, Tah-Deoli,Wardha | POLY-I | 189 | 76 | |
| | | | DIR-IIND | 108 | 57 | |
| 40 | 4598 | Maharashtra Shikshan Prasarak Mandals,Sommaya Diploma In Engineering, Wadgaon Dist Chandrapur | POLY-I | 378 | 360 | दि. 31 ऑक्टो.2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 368 | 296 | |
| 41 | 4601 | Guruvandan Mahila Kalyankari Bahuuddeshiya Mandal's Guru Sai Polytechnic College, Mauza Datala, Chandrapur | POLY-I | 315 | 134 | |
| | | | DIR-IIND | 400 | 66 | |
| 42 | 4602 | Shri Gurudeo Educational Memorial & Cultural Society, Om Polytechnic College, Mauza Parsodi, Tal-Umrer,Nagpur | POLY-I | 252 | 33 | दि. 1 नोव्हें. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 247 | 58 | |
| 43 | 4603 | Young Engineer's Education Society, Maharashtra Institute of Polytecnic, Betala, Bramhapuri,Chandrapur | POLY-I | 221 | 14 | |
| | | | DIR-IIND | 238 | 80 | |
| 44 | 4604 | Gramin Vikas Multipurpose Education Society,Prabhat Diploma College of Engineering, Mouza Rui, Ta- Bramhapuri, Chandrapur | POLY-I | 189 | 85 | |
| | | | DIR-IIND | 158 | 96 | |
| 45 | 4608 | Shri Lalbahaddur Shastri Shikshan Prasarak Mandal, VJ Polytechnic, Mouza Khamona, Tah- Rajura, Chandrapur | POLY-I | 159 | 21 | |
| | | | DIR-IIND | 264 | 75 | |
| 46 | 4609 | Shri Vyankatesh Shikshan Sanstha's,Shri Vyankatesh Polytechnic, Yelakeli, Ta-Seloo,Wardha | POLY-I | 252 | 2 | |
| | | | DIR-IIND | 282 | 20 | |
| 47 | 4610 | Ballarpur Seva Samiti, Jainuddin Zaweri Polytechnic, Dewai Govindpur, Tukum, Chandrapur | POLY-I | 189 | 11 | |
| | | | DIR-IIND | 197 | 74 | |
| 48 | 4612 | Navneet Bahuuddeshya Sanstha, Kinkar Institute Of Technology,Seloo,Dist.Wardha | POLY-I | 315 | 138 | |
| | | | DIR-IIND | 274 | 109 | |
| 49 | 4613 | Suryodaya College of Engineering & Technology, Nagpur | POLY-I | 90 | 46 | |
| | | | DIR-IIND | 80 | 77 | |
| 50 | 4639 | Renaissance Polytechnic,Chandrapur | POLY-I | 315 | 47 | |
| | | | DIR-IIND | 264 | 61 | |
| 51 | 4642 | Wainganga Polytechnic, Sakoli | POLY-I | 253 | 28 | |
| | | | DIR-IIND | 295 | 151 | |
| 52 | 4653 | ANJANYA POLYTECHNIC COLLEGE, Tumsar | POLY-I | 315 | 8 | |
| | | | DIR-IIND | 257 | 68 | |
| 53 | 4008 | Government Polytechnic, Sakoli | POLY-I | 315 | 207 | |
| | | | DIR-IIND | 201 | 95 | |

| अ.क्र | संस्था क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशीत संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 54 | 4009 | Government Polytechnic, Bramhapuri | POLY-I | 558 | 120 | दि. 2 नोव्हें. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 469 | 181 | |
| 55 | 4010 | Government Polytechnic, Gadchiroli | POLY-I | 315 | 48 | |
| | | | DIR-IIND | 293 | 93 | |
| 56 | 4011 | Government Polytechnic Gondia | POLY-I | 378 | 296 | |
| | | | DIR-IIND | 174 | 132 | |
| 57 | 4012 | Government Polytechnic, Sadar, Nagpur | POLY-I | 865 | 751 | दि. 3 नोव्हें. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 241 | 177 | |
| 58 | 4013 | Government Polytechnic, Arvi | POLY-I | 357 | 189 | दि. 5 नोव्हें. 2018 (सकाळी 10.30 ला हजर राहणे) |
| | | | DIR-IIND | 215 | 68 | |
| 59 | 4015 | Acharya Shrimannarayan Polytechnic, Pimpri-Wardha | POLY-I | 126 | 101 | |
| | | | DIR-IIND | 204 | 60 | |
| 60 | 4023 | Adv.V.R.Manohar Institute of Diploma in Medical Laboratory Technology, Nagpur | POLY-I | 63 | 63 | |
| | | | DIR-IIND | 14 | 14 | |

**टिप-गुणवत्ता यादीची पडताळणी झाल्यानंतर त्रुट्यांची पुर्तता 1 आठवड्याच्या आत करावी**

**(Gulabrao Thakare)**
Joint Director
Technical Education
R. O. NAGPUR

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स – 2269 0007.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादीत

जा.क्र.: १०/एडीएम/ प्रवेश यादी पडताळणी/२०१८/ ११६८

दिनांक : 28 SEP 2018

प्रति,

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्यांची अंतिम पडताळणी करणेबाबत...

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण क्रमांक २३२, दि. ०५.०७.२०१८.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्रमांक पत्र क्रमांक संकीर्ण-२०१५/ प्र.क्र. २५२/तांशि-४ दि. ०५.०७.२०१८.

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५, दिनांक १७.८.२०१५ लागू झाला असून त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक २०० अन्वये पूर्ण वेळ व्यावसायिक पदविका तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन (सुधारीत) प्रवेश नियम २०१८ दिनांक ५.६.२०१८ अन्वये प्रसिध्द केले आहेत. यापूर्वी दिनांक २४.४.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०३ अन्वये पूर्ण वेळ व्यावसायिक पदविका तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन नियम, २०१७ अन्वये पदविका प्रवेश नियम हे मुख्य नियम असून दिनांक ५.६.२०१८ रोजी निर्गमित केलेले प्रवेश नियम हे त्यास पूरक / सुधारीत नियम असल्याचे शासनाने प्रसिध्द केले आहेत.

तद्नंतर महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनिमयन) अधिनियम २०१५ नुसार दि. १९ मे, २०१८ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या अधिसूचनेसोबतच्या अनुसूची 'क' (Schedule A) मधील व्यावसायिक पदविका पाठयक्रमापैकी अनुक्रमांक १ येथील 'अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका', अनुक्रमांक २ येथील 'औषधनिर्माणाशास्त्र पदविका' व अनुक्रमांक ३ येथील 'हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका' हे तीन व्यावसायिक अभ्यासक्रम दि. ०५.०७.२०१८ च्या संदर्भिय महाराष्ट्र शासन राजपत्र / शासन निर्णयाव्दारे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्वरीत संदर्भासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र व शासन निर्णयाची प्रत सोबत जोडत आहे. तसेच या पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत जाण्यापुर्वी

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत या पदविका अभ्याक्रमांच्या प्रवेशासाठी जी कार्यपध्दती उपयोगात आणण्यात येत होती सर्वसाधारणपणे तशीच कार्यपध्दती शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता व त्यापुढे अवलंबविण्याची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालयाने करावी, असे संदर्भिय शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे. दि. ०५.०७.२०१८ रोजी संदर्भिय महाराष्ट्र शासन राजपत्र प्रसिध्द झाल्यामुळे विविध पदविका स्तरावरील अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेतुन संदर्भिय महाराष्ट्र शासन राजपत्राच्या दिनांकापासुन वगळण्यात आली असल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता पदविका अभ्यासक्रमाची सुरु केलेली प्रवेश प्रक्रिया संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत पुढे चालु ठेऊन पुर्ण करण्यात आलेली आहे.

त्याअनुसरुन संदर्भिय महाराष्ट्र शासनाचे राजपत्र /शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील सर्व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचेवतीने अंतिम पडताळणी करण्यासाठी आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे.

तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश यादी शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचना/प्रवेश नियम व या संचालनालयाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अधिसूचना/परिपत्रकानुसार अंतिम पडताळणी दिनांक ३१.१०.२०१८ पर्यंत करण्यात यावी व त्याची एक प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे व माहितीकरिता या संचालनालयाकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादीची अंतिम पडताळणी करताना खालील बाबींची पडताळणी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

१. प्रवेश यादी पडताळणीसाठी आपल्या कार्यालयास देण्यात आलेल्या संकेतांक व पासवर्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने लॉगइन करून संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची प्रिंटआऊट घेऊन ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी. कोणत्याही परिस्थितीत संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदा.Word File etc.) पडताळणीकरिता वापरू नये.

२. प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर सदर संस्थेस सक्षम प्राधिकरणाची (AICTE/PCI/MSBTE) परवानगी असल्याचे कागदपत्र पडताळणी करण्यात यावेत.

३. नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (F D) भरणा केली आहे किंवा नाही याची पडताळणी करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांकडून शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्काची आकारणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक टीईम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२.०२.२०१८ मधील शासन निर्णयात नमुद केल्यानुसार, अशा संस्थांकडून नोंदणी शुल्क घेण्यात यावे. या अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

४. अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीवेळी तपासणे व गुणवत्ता यादी सोबत जोडणे.

५. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या पडताळणी करताना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे ही बाब पडताळणी पथकास सूचित करावी. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने प्रसिध्द केलेले असाधारण राजपत्र क्रमांक १०३ दि. २४.०४.२०१७ व ३०० दि. ०५.०६.२०१८ मध्ये तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद तरतुदीनुसार पडताळणी करावी.

६. प्रवेश यादी पडताळणीमध्ये सर्व विभागांमध्ये एकसूत्रता असण्याच्या दृष्टीने प्रवेशयादीमध्ये आढळून येणा-या अनियमिततेबाबत या संचालनालयाच्या स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रक/अधिसूचनेनुसार आपल्या स्तरावरुन प्रवेश यादीची अंतिम पडताळणी करण्याची कार्यवाही करावी.

७. विभागीय कार्यालयांनी अंतिम पडताळणी केलेल्या व न केलेल्या प्रवेश याद्यांची कारणांसह संस्थानिहाय माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात या संचालनालयाकडे पाठविण्यात यावी.

८. संस्थेकडून प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर शुल्क परताव्याबाबत संबंधित संस्थेबद्दल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन विभागीय स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा. मात्र प्रवेश यादी प्रमाणित करण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येवू नये. तसेच शुल्क परतावा बाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडून घेण्यात यावे व सोबत सादर करावे.

९. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याच्या वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

१०. शासन तसेच या संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

११. संस्थेने विहीत दिनांकापर्यंत विभागीय कार्यालयात प्रवेश यादी सादर करणे आवश्यक असल्याचे आपल्या विभागातील सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावे.

१२. मागासवर्गीय उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत या संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना/परिपत्रक/पत्र विचारात घेऊन अशा प्रकरणी अंतिम पडताळणी करावी.

१३. आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त असलेलया सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानीत व विद्यापीठ विभाग संस्था यांमधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्यतिरिक्त संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रवेश यादीची अंतिम पडताळणी शासन नियमानुसार करण्यात यावी.

१४. प्रवेशित उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी होऊन नोंदणी झालेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

१५. एखादया विशिष्ट प्रकरणी मा.सर्वोच्च वा मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

१६. उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व " डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये वितरीत केलेल्या शिष्यवृत्तींचे "उपयोगिता प्रमाणपत्र" संस्थांकडून घेण्यात यावे.

१७. प्रवेश याद्या पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न करणा-या संस्थांमधील उमेदवारांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थाप्रमुख व्यक्तीश: जबाबदार राहतील ही बाब सर्व संस्थांच्या निदर्शनास लेखी स्वरुपात आणण्यात यावी.

प्रवेश यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची नोंद घ्यावी व सर्व संबंधीतांना या संबंधी सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

( डॉ अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा. सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सादर.

आपल्या विभागातील पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थानिहाय प्रवेश याद्या अंतिम पडताळणी बाबतची एकत्रित माहिती खालील विवरणपत्रात भरुन संचालनालयास सादर करण्यात यावी.

## विवरणपत्र

| विभागाचे नाव : | | | | |
|---|---|---|---|---|
| अभ्यासक्रम (पदविका) | विभागात असलेल्या विनाअनुदानीत संस्थांची संख्या | त्यापैकी प्रवेश याद्या पडताळणी केलेल्या संस्थांची संख्या | प्रवेश याद्या पडताळणी करावयाच्या राहिलेल्या संस्थांची संख्या (कारणांसहित) | उर्वरीत संस्थांच्या पडताळणीसाठी निर्धारीत केलेला अंतिम दिनांक |
| | | | | |